पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ६१५ दिनांक - ११/०८/२०२३**

पर्वती पोलीस स्टेशन,पुणे शहर

## बिपीन मिलिंद मापारी (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०३ साथीदार यांचे विरुद्ध मकोका अंतर्गत कारवाई

दि.३१/०३/२०२३ रोजी फिर्यादी हे त्यांचे मित्रासोबत फोनवर बोलत असताना आरोपी नामे ऋषि उर्फ भावडया धिवार,निरज सुनिल खंडागळे,बिपिन मिलिंद मापारी,दौलत पिराजी आगम असे फिर्यादी यांचे जवळ येवुन,स्वप्निल उर्फ बाबा जगताप याच्या कडे रागाने का बघत असतो,तो आमचा मित्र आहे,तुला खुप माज आला आहे का असे म्हणुन त्यांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन,लाथा-बुक्क्यांनी मारहाण करुन कसलेतरी धारदार हत्याराने फिर्यादीचे डोक्यात व पाठीवर मारुन,त्यांना गंभीर जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला,म्हणुन पर्वती पोलीस स्टेशन येथे **पर्वती (दत्तवाडी) पोलीस स्टेशन गु.रं.नं. ८८/२०२३,भा.दं.वि.क.३०७,३२६,३२३,५०४,३४,आर्म ॲक्ट ४(२५),म.पो.अधि.कलम ३७(१)सह १३५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्याच्या तपासादरम्यान सदरचा गुन्हा हा आरोपी नामे १)**बिपीन मिलिंद मापारी,वय २४ वर्षे,रा.घर नं.६९७,लायन्स क्लब,दत्तवाडी पुणे (टोळी प्रमुख) २)त्रषिकेश ऊर्फ भावडया बबन धिवार, वय २१ वर्षे,रा.घर नं.८६०,दत्तवाडी,पुणे ३)निरज सुनिल खंडागळे,वय २० वर्षे,रा,सदर ४)विशाल ऊर्फ दौलत पिराजी आगम,वय ३४ वर्षे,रा.सदर (टोळी सदस्य) यांनी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे.**

वरील नमुद आरोपींकडे सखोल तपास केला असता व नमुद आरोपीचे पुर्व रेकॉर्डची पाहणी करता यातील आरोपी नामे बिपीन मिलिंद मापारी (टोळी प्रमुख) याचे विरुध्द ०७ गुन्हे व ऋषिकेश धिवार याचेवर ०५ गुन्हे दाखल असुन त्यांनी बेकायदेशीर मार्गाने स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी इतर फायदा मिळविण्याच्या उद्देशाने संघटित गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणून किंवा संघटनेच्या वतीने एकटयाने किंवा संयुक्तपणे हिंसाचाराचा वापर करून किंवा हिंसाचार करण्याची धमकी देवून किंवा धाकदपटशा दाखवून किंवा जुलुम जबरदस्ती करून किंवा अन्य अवैध मार्गाने आपली बेकायदेशीर कृत्य चालु ठेवुन संघटना किंवा टोळी म्हणुन संयुक्तपणे संघटित गुन्हेगारी कृत्य करणारी टोळी तयार केली असुन,वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करुनही त्यांनी पुन्हा-पुन्हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे केलेले आहेत.

सदर टोळीने मागील १० वर्षात खूनाचा प्रयत्न, घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापुर्वक जबर दुखापत पोचवणे, दुखापत करणे, बेकायदेशीर जमाव जमवणे, बेकायदेशीररित्या शस्त्र जवळ बाळगणे इत्यादी प्रकारचे गुन्हे केल्याचे निदर्शनास आले आहे. सदरचे गुन्हे हे अवैध मार्गाने स्वतःसाठी व इतरांसाठी गैरवाजवी इतर फायदा मिळविण्यासाठी, टोळीचे वर्चस्वासाठी व दहशत कायम ठेवण्यासाठी सातत्याने चालु ठेवल्याचे निषन्न होत आहे.

दाखल गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(४) प्रमाणे कलम वाढविण्यासाठी सदर मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पर्वती पोलीस स्टेशन,पुणे शहर,श्री.जयराम पायगुडे यांनी मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०३,पुणे शहर,श्री. सुहेल शर्मा यांचे मार्फतीने मा.अप्पर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील यांना सादर केला होता.

सदर प्रकरणी छाननी करून पर्वती (दत्तवाडी) पोलीस स्टेशन गु.रं.नं.८८/२०२३ भा.दं.वि. क.३०७,३२६,३२३,५०४,३४,आर्म ॲक्ट ४(२५),म.पो.अधि.कलम ३७(१) सह १३५ या गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii),३(४) या कलमाचा अंतर्भाव करण्याची मा. अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील यांनी पुर्व मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा.सहा.पोलीस आयुक्त सिंहगड रोड,पुणे शहर श्री.अप्पासाहेब शेवाळे हे करीत आहेत.

सदर कारवाई मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर श्री.संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील, पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०३,श्री.सुहेल शर्मा, मा.सहा.पोलीस आयुक्त,सिंहगड रोड,पुणे शहर,श्री.अप्पासाहेब शेवाळे यांचे मार्गदर्शनाखाली पर्वती पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.जयराम पायगुडे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.विजय खोमणे, पोलीस उप-निरीक्षक,जगदाळे, पोलीस अंमलदार,दिपक लोधा, महेश चौगुले, गोरख मादगुडे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्तपुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्राणांवर बारकाईने लक्ष देवुन शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व नागरीकां मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अमंलदार यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ४५ वी कारवाई आहे.**